| MHPU120001372024 | **नियमित दिवाणी दावा क्र.३६/२०२४**<br>**निशाणी क्रमांक ०५ वरील आदेश**<br>(रेखा चंद्रकांत बोडरे व इतर विरूद्ध सुनील लक्ष्मण अहिरे व इतर) |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी दावा मिळकतीची विक्री करुन त्रयस्थ पक्षकारांचे हक्क व हितसंबंध निर्माण करु नये. तसेच दावा मिळकतीमध्ये वादीच्या कब्जास हरकत, अडथळा करु नये अशा तुर्तातुर्त मनाई हुकुमाकरीता दाखल केलेला आहे.

**०२. दावा मिळकतीचे वर्णन :–**

मौजे किकवी, ता. भोर, जि. पुणे येथे स्थित असलेले सिटी सर्वे क्र.६७, एकूण क्षेत्र ८३.४० चौ.मी. व सिटी सर्वे क्र.७० एकूण क्षेत्र ५०७.९ चौ.मी. व त्या अनुषंगाने दि.२८.०४.२०१० व दि.२०.१२.२०२३ रोजी नोंदविण्यात आलेले खरेदीदस्त.

**(येणेप्रमाणे अर्ज परिच्छेद क्र.१ मध्ये विशेषतः नमूद केलेल्या उपरोक्त वाद मिळकतीस यापुढे सोईकरीता "दावा मिळकत" असे संबोधण्यात येईल )**

**०३.** वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही वादी यांची वडिलोपार्जित मालकीची मिळकत आहे. सदर मिळकतीचे मूळ मालक दशरथ दगडू बोडरे यांच्या मृत्युनंतर सदर मिळकत ही वादी यांचे पूर्वहक्कदार चंद्रकांत दशरथ बोडरे व त्यांचे भाऊ दत्तात्रय दशरथ बोडरे यांना वारसाहक्कांनी आलेली आहे. त्याप्रमाणे वादी यांचे पूर्वहक्कदार दावा मिळकतीचा उपभोग घेत होते व त्यांच्या मृत्युपश्चात वादी हे दावा मिळकतीचा उपभोग घेत आहेत. त्याचप्रमाणे वादी यांनी घर देखील त्या ठिकाणी बांधलेले आहे व सदर घरात वादी हे वास्तव्यास आहेत.

**०४.** वादीच्या कथनाप्रमाणे दत्तात्रय दशरथ बोडरे यांचा कधीही विवाह झाला नव्हता. त्यामुळे त्यांना कोणीही वारस नाही. त्याचप्रमाणे ते बऱ्याच वर्षापूर्वी घर सोडून निघून गेलेले आहेत. सबब, प्रस्तुत वादी हेच सदर दत्तात्रय यांचे वारसदार आहेत. वादी यांचे पूर्वहक्कदार चंद्रकांत दशरथ बोडरे यांना कायद्याचे ज्ञान नव्हते. त्याचप्रमाणे ते दारुच्या आहारी गेलेले होते, याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र.१ यांनी कोणताही मोबदला न देता सिटी सर्वे क्र.६७ पैकी क्षेत्र २०.८५ चौ.मी. व सिटी सर्वे क्र.७० पैकी ७९.१५ चौ.मी. या क्षेत्राचे दि.२८.०४.२०१० रोजी बेकायदेशीर खरेदीखत करुन घेतलेले आहे. त्यानंतर सदरचे क्षेत्र प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांना बेकायदेशीरपणे दि.२०.१२.२०२३ रोजी खरेदी दिलेले आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी बेकायदेशीर मार्गाने महसूल अभिलेखी त्यांची नावे नोंद केलेली आहेत.

**०५.** वादीच्या कथनाप्रमाणे दि.११.०२.२०२४ रोजी महसूल नोंदणीच्या आधारे प्रतिवादी क्र.२ यांनी बेकायदेशीरपणे जेसीबी मशीनीच्या सहाय्याने काम चालू केले. त्यावेळी वादी यांनी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रतिवादी यांनी काही ऐकून घेतले नाही. याउलट, 'मध्ये आलात तर जिवंत सोडणार नाही' अशी धमकी दिली. त्यानंतर वादी यांनी सर्व कागदपत्रे काढल्यानंतर त्यांना प्रतिवादी यांच्या बेकायदेशीर कृत्यांची जाणीव झाली.

**०६.** वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी बेकायदेशीरपणे खरेदीखत नोंदवून घेतलेली आहेत. वादी व त्यांचे पूर्वहक्कदार यांच्यामध्ये सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. अशा परिस्थितीत वादींचा अविभक्त हिस्सा असताना देखील त्यांच्या संमतीशिवाय प्रतिवादी क्र.१ व २ यांनी बेकायदेशीररित्या खरेदीखते केलेली आहेत. त्याचप्रमाणे सदर खरेदीखते ही विनामोबदला, विनाताब्याची व पोकळीस्त असल्याने सदर

खरेदीखते ही वादी यांच्यावर बंधनकारक नाहीत. त्यामुळे दि.१६.०२.२०२४ रोजी वादी यांनी त्यांच्या वकीलांमार्फत प्रतिवादी यांना कायदेशीर नोटीस देवून सदर खरेदीखते रद्द करुन देण्याबाबत कळविलेले होते. परंतु सदर नोटीस प्राप्त झाल्यानंतर दि.२८.०२.२०२४ रोजी प्रतिवादी यांनी खोटे व बेकायदेशीर उत्तर पाठविलेले आहे.

**०७.** वादींच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.२ यांनी दांडगाव्याने दावा मिळकतीत घुसुन कंपाऊड करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच वादी यांनी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता त्यांना धमकी दिलेली आहे. सबब, दि.२४.०२.२०२४ रोजी वादी यांनी प्रतिवादी क्र.२ यांचे विरोधात राजगड पोलीस स्टेशन येथे तक्रार दिलेली आहे. परंतु त्या उपरदेखील प्रतिवादी यांनी बेकायदेशीर कृत्ये चालूच ठेवलेली आहेत. तसेच विक्री करण्याची देखील धमकी दिलेली आहे. सबब, वादीस सदरचा दावा दाखल करणे भाग पडलेले आहे. परंतु दावा गुणदोषावर निकाली होण्यास बराच अवधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात प्रतिवादी यांनी वाद मिळकतीमध्ये घुसुन बांधकाम केल्यास तसेच दावा मिळकतीची विक्री केल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्याचप्रमाणे वादीस प्रथमदर्शनी केस असून न्यायाचा तराजू देखील त्यांच्या बाजूने आहे. सबब, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०८.** प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. प्रतिवादी यांनी वादीच्या अर्जातील सर्व मजकूर नाकरलेला आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे वादी यांनी आवश्यक पक्षकारांना दाव्यात समाविष्ट केलेले नाही. त्यामुळे त्या कारणास्तव दावा चालण्यास पात्र नाही. तसेच दाव्यास कोणतेही कारण घडलेले नसल्याने दावा चालण्यास पात्र नाही. तसेच दावा हा मुदतीत दाखल केला नसल्याने त्या कारणास्तव देखील दावा रद्द होण्यास पात्र आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे दि.२८.०४.२०१० रोजी

प्रतिवादी क्र.१ यांना विक्री केलेली मिळकत ही त्यांच्या ताब्यात होती तीच मिळकत त्यांनी दि.२०.१२.२०२३ रोजी प्रतिवादी क्र.२ यांना विक्री केलेली आहे. वादी यांनी दि.२८.०४.२०१० ते दि.१६.०२.२०२४ रोजी पर्यंत कोणताही दावा दाखल केलेला नाही. सबब, प्रस्तुतचा दावा हा मुदतीत नाही.

०९. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे वादींचे पूर्वहक्कदार चंद्रकांत दशरथ बोडरे यांनी कायदेशीर गरजेपोटी प्रतिवादी क्र.१ यांना मिळकत विक्री केलेली आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ हे त्याचे मालक झालेले होते. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ यांनी सदर मिळकत ही प्रतिवादी क्र.१ यांना विक्री करुन त्याचा ताबादेखील दिलेला आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे मयत दत्तात्रय बोडरे यांचे लग्न झालेले असून त्यांना एक मुलगा व एक मुलगी असे वारस आहेत. परंतु त्यांचा हिस्सा गिळंकृत करण्यसाठी वादी यांनी त्यांच्या बाबतीत खोटे कथन केलेले आहे.

१०. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे मयत चंद्रकांत बोडरे हे माळकरी इसम होते व त्यांना दारुचे कधीही व्यसन नव्हते. त्याचप्रमाणे प्रतिवादी यांनी संपूर्ण मोबदला हा चंद्रकांत बोडरे यांना दिलेला होता. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या नावाची मालमत्ता पत्रकी नोंद झालेली आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे मयत दत्तात्रय दशरथ बोडरे यांच्या वारसांनी प्रतिवादी क्र.२ यांना साठेखत करुन दिलेले आहे. सदर साठेखत हे वादी यांना समजल्याने त्यांनी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे चंद्रकांत बोडरे यांनी त्यांची मिळकत पूर्वीच विक्री केल्याने वादी यांची कोणतीही मिळकत शिल्लक नाही. याउलट मिळकत शिल्लक असल्यास ती मयत दत्तात्रय यांची आहे. परंतु सदर दत्तात्रय यांच्या वारसांनी त्यांच्या हिस्याचे साठेखत यापूर्वीच प्रतिवादी क्र.२ यांना करुन दिले

असल्याबाबत त्याबाबत बोलण्याचा कोणताही कायदेशीर हक्क वादी यांना नाही. सबब, त्यांनी अर्ज व दावा नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

**११.** अर्ज, म्हणणे, प्रकरणातील कागदपत्रे आणि वादी व प्रतिवादीच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद यावरुन पुढील मुद्दे माझे विचारार्थ उद्भवतात. त्यावर मी कारणांसहित उत्तरे यापुढे नमुद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे प्रथमदर्शनी केस त्यांच्या लाभात असल्याचे सिध्द करतात काय ? | **नकारार्थी** |
| २. | तुर्तातूर्त मनाई न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे असे वादी सिध्द करतात काय ? | **नकारार्थी** |
| ३. | सोयीस्करतेचा तुला वादी यांच्या बाजुने आहे असे ते सिध्द करतात काय ? | **नकारार्थी** |
| ४. | आदेश काय ? | **अर्ज नामंजुर करण्यात येतो.** |

**१२.** वादी व प्रतिवादीच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या कथनाशी सुसंगत असा युक्तीवाद केलेला आहे.

**–का र ण मि मां सा –**

**१३.** प्रस्तुतचा अर्ज हा तुर्तातूर्त मनाई हुकूमाकरीता आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज निकाली करताना खालील गोष्टींची पडताळणी करणे आवश्यक आहे.

**अ.** सकृतदर्शनी केस.

**ब.** अपरिमित नुकसान.

**क.** सोयीचा समतोल.

**ड.** पक्षकारांचे वर्तन (Conduct of the parties)

**मुद्दा क्रमांक १ करीता :–**

**१४.** मुद्दा क्रमांक १ हा सकृतदर्शनी केस यासंबंधी आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये सकृतदर्शनी केस याबाबत व्याख्या दिलेली नाही. परंतु, मा.सर्वोच्च न्यायालय व मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी विविध न्यायनिवाडयांमध्ये सकृतदर्शनी केस निश्चित केलेली आहे. सकृतदर्शनी केस म्हणजे जर एखादया गोष्टीचे पुरावे दिले गेल्यास ती गोष्ट शाबीत होईल. थोडक्यात सकृतदर्शनी केस म्हणजे वादीच्या यशाची शाश्वती. प्रस्तुत दाव्यामध्ये वादींच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकत ही वादी यांची वडिलार्जित मिळकत असून त्यामध्ये वादी यांचा देखील हक्क व अधिकार आहे. अशा परिस्थितीत वादी यांचे पूर्वहक्कदार चंद्रकांत बोडरे यांची फसवणूक करुन प्रतिवादी क्र.१ यांनी खरेदीखत केलेले आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ व २ यांनी संगनमत करुन प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांच्या लाभात खरेदीखत करुन दिलेले आहे. सबब, सदर खरेदीखत रद्द बातल ठरविण्याकरीता व त्या अनुषंगाने मनाईकरीता वादी यांनी प्रस्तुतचा दावा व अर्ज दाखल केलेला आहे. याउलट प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे मयत चंद्रकांत बोडरे यांनी त्यांच्या कौटुंबिक गरजाकरीता दावा मिळकत विक्री केलेली असून त्याप्रमाणे प्रतिवादी यांच्या नावाची नोंद महसूल अभिलेखी करण्यात आलेली आहे. परंतु वादी यांनी मयत दत्तात्रय यांचा हिस्सा गिळंकृत करण्याच्या उद्देशाने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. सबब, उपरोक्त गोष्टी विचारात घेवून प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णित करणे योग्य राहील.

**१५.** वादीच्या वादपत्राचे व वादीने दाखल केलेल्या मालमत्ता पत्रकांचे अवलोकन करता दावा मिळकत ही मुळची बाबु दगडू बोडरे यांच्या मालकीची असल्याचे दिसून येते. त्यांच्या मृत्युपश्चात सदरची मिळकत ही दशरथ दगडू बोडरे यांना मिळाल्याचे दिसून येते व त्यानंतर सदर मिळकतीस वादी यांचे पूर्वहक्कदार चंद्रकांत दशरथ बोडरे यांच्या नावाची नोंद झाल्याचे दिसून येते. वादीने दाखल केलेल्या खरेदीखताचे अवलोकन करता मयत चंद्रकांत दशरथ बोडरे यांनी दि.२८.०४.२०१० रोजी दावा मिळकत ही खरेदीखताने प्रतिवादी क्र.१

यांना विक्री केल्याचे दिसून येते. वादीच्या कथनाप्रमाणे सदर खरेदीखत हे बिनताब्याचे व पोकळीस्त अशा स्वरुपाचे आहे. तसेच सदर खरेदीखताप्रमाणे मोबदला देखील देण्यात आलेला नाही. त्या अनुषंगाने खरेदीखतातील मजकूराचे अवलोकन करता रक्कम रु.३२,०००/- मोबदल्यापोटी सदरचे खरेदीखत करण्यात आल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे रक्कम रु. १४,०००/- रोख स्वरुपात व रक्कम रु.१८,०००/- ही धनादेशाद्वारे दिल्याचे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे सदर खरेदीखत हे नोंदणीकृत आहे. यदाकदाचित मोबदला दिला गेला नसल्यास मयत चंद्रकांत बोडरे यांनी त्यांच्या हयातीत त्याबाबत नक्कीच प्रश्न उपस्थित केला असता परंतु हे नमूद करणे आवश्यक आहे की, सदर चंद्रकांत बोडरे यांनी त्यांच्या हयातीत मोबदल्यापोटी अथवा फसवणूकीबाबत कोणतीही तक्रार न्यायालयात अथवा इतर तत्सम प्राधिकरणाकडे केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. त्याचप्रमाणे सदर खरेदीखत हे सन २०१० मध्ये करण्यात आलेले आहे. त्यानंतर सदर प्रतिवादी क्र.१ यांच्या नावाची मालमत्तापत्रकी नोंद झाल्याचे देखील दिसून येते. त्यानंतर १४ वर्षाच्या विलंबाने प्रस्तुतचा दावा दाखल करण्यात आलेला आहे.

**१६.** वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही वडीलार्जित मिळकत असल्याने त्यांचा त्यामध्ये हक्क व अधिकार आहे. हिंदु कायद्यातील स्थापित सिध्दांतानुसार वादी यांचा दावा मिळकतीमध्ये जन्मजात हक्क व अधिकार आहे ही बाब जरी विचारात घेतली परंतु त्या परिस्थितीत देखील कुटुंबातील कर्तास एकत्रीत कुटुंबाच्या आर्थिक गरजांपोटी मिळकत विक्री करण्याचे अधिकार आहेत. त्या अनुषंगाने खरेदी खताचे अवलोकन करता सदर खरेदीखतातील परिच्छेद क्र.५ मध्ये कौटुंबिक अडचणीबाबत स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे दावा मिळकतीचा ताबा देखील दिल्याबाबत परिच्छेद क्र.६ मध्ये नमूद करण्यात आलेले आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ यांनी सन २०२३ मध्ये सदर

मिळकत ही प्रतिवादी क्र.२ यांना खरेदी दिल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.२ यांच्यादेखील नावाची नोंद मालमत्तापत्रकी झाल्याचे दिसून येते. तसेच वादीचे पूर्वहक्कदार चंद्रकांत बोडरे यांनी केवळ त्यांच्या हिश्याचेच क्षेत्र विक्री केल्याचे खरेदीपत्रावरुन दिसून येते. वादीने दाखल केलेल्या मालमत्तापत्रकांचे अवलोकन करता दि.११.१०.२०१० रोजी प्रतिवादी क्र.१ यांच्या नावाची नोंद फेरफार क्र.५६ अन्वये झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सदर नोंदीबाबत देखील वादी अथवा त्यांच्या पूर्वहक्कदारांनी आक्षेप घेतल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादीने दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता त्या ठिकाणी घर मिळकत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्याप्रमाणे ग्रामपंचायत अभिलेखी सुरुवातीस प्रतिवादी क्र.१ व त्यानंतर प्रतिवादी क्र.२ यांच्या नावाची नोंद असल्याचे देखील सकृतदर्शनी दिसून येते. सदर नोंदीबाबत देखील वादी अथवा त्यांच्या पूर्वहक्कदारांनी कोणताही आक्षेप घेतल्याचे दिसून येत नाही. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांचे सकृतदर्शनी विचार करता सदर नोंदणीकृत खरेदीखत हे फसवणूक करुन घेतल्याबाबत प्रथमदर्शनी कोणतेही कागद अभिलेखावर दाखल नाहीत. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांवरुन वादींस सकृतदर्शनी केस आहे असे म्हणणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक २ व ३ करीता :–**

**१७.** मुद्दा क्रमांक २ हा अपरिमित नुकसान व मुद्दा क्रमांक ३ हा सोयीचा समतोल याच्याशी निगडीत असल्यामुळे सदरचे दोन्ही मुद्दे हे एकमेकांशी संलग्न आहेत. सबब, पुराव्याची पुनरावृत्ती टाळणेकरीता मी उपरोक्त दोन्ही मुद्दे एकत्रीत चर्चित आहेत.

**१८.** कायद्यातील स्थापित सिध्दांतानुसार वादीने केवळ सकृतदर्शनी केस शाबीत करणे योग्य नाही. त्याचबरोबर त्यांनी तुर्तातूर्त मनाई न दिल्यास त्यांना अपरिमित असे नुकसान होवू शकते तसेच न्यायाचा समतोल देखील त्यांच्या बाजूने आहे हे शाबीत करणे आवश्यक आहे.

**१९.** वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे त्यांच्या दावा मिळकतीतील ताबा वहिवाटीस प्रतिवादी यांनी हरकत अडथळा करु नये याकरीता व दावा मिळकतीची विक्री करु नये अशा आशयाची मनाई मागितलेली आहे. सदर मनाईच्या अनुषंगाने ताबा पाहणे महत्वाचे आहे. खरेदीखतांचे अवलोकन करता वादींचे पूर्वहक्कदार यांनी प्रतिवादी क्र.१ यांना ताबा दिल्याबाबत खरेदीखतामध्ये नमूद केलेले आहे. सदर ताब्याच्या अनुषंगाने वादींच्या पूर्वहक्कदारांनी त्यांच्या हयातीत कोणताही वाद उपस्थित केला नव्हता. त्याचप्रमाणे प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन सदर मिळकतीत घर असल्याचे देखील सकृतदर्शनी दिसून येते. त्याप्रमाणे ग्रामपंचायत कर आकारणी उताऱ्यास प्रतिवादींच्या नावाची नोंद दिसून येते. वादी यांनी देखील कर आकारणी रजिस्टर उतारा दाखल केलेला आहे. सदर उताऱ्यास वादीच्या पूर्वहक्कदारांचे नाव दिसून येते. परंतु मिळकतीच्या वर्णनामध्ये पडीक घर असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे हे नमूद करणे आवश्यक आहे की, सिटी सर्वे क्र.६७ चे एकूण क्षेत्र ८३.४० चौ.मी. असून तयापैकी २०.८५ चौ.मी. इतकेच क्षेत्र प्रतिवादी यांना विक्री करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे सिटी सर्वे क्र.७० चे एकूण क्षेत्र ५०७.९० चौ.मी. असून त्यापैकी ७९.१५ चौ.मी. क्षेत्र विक्री करण्यात आलेले आहे. त्यामुळे विक्री व्यतिरिक्त उर्वरित क्षेत्रात वादी यांची मिळकत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे केवळ वादी यांचा ताबा दिसून येत नाही. याउलट खरेदीखत व करआकारणी पत्रकावरुन प्रतिवादी यांचा ताबा देखील दिसून येतो. त्याचप्रमाणे वादी यांनी दाखल केलेल्या अदखलपात्र तक्रारी चे अवलोकन करता त्यामध्ये देखील वादी व प्रतिवादी हे शेजारी शेजारी राहण्यास असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत दावा मिळकतीत केवळ वादी यांचाच ताबा आहे असा निष्कर्ष काढणे न्यायोचित होणार नाही.

**२०.** त्याचप्रमाणे उपरोक्त चर्चेदरम्यान वादी यास सकृतदर्शनी केस नसल्याचे निरीक्षण मी नोंदविलेले आहे. सकृतदर्शनी केस नसताना सोयीचा समतोल हा वादीच्या

बाजूने नाही. तसेच मालमत्ता हस्तातंरण कायदा कलम ५२ प्रमाणे वादीस संरक्षण देखील उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत वादीचे अपरिमित नुकसान देखील होणार नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.२ व ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ४ करीता –**

**२१.** मुद्दा क्रमांक १ ते ३ चे विवेचनावरुन वादीस प्रथमदर्शनी केस नाही, तसेच सोयीचा समतोल व अपरिमित नुकसान वादीचे होत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे मुद्दा क्रमांक ४ च्या निष्कर्षाकरीता मी, पुढील आदेश पारीत करतो.

**– आ दे श –**

प्रस्तुत अर्ज (निशाणी ५) नामंजूर करण्यात येत आहे.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2026.01.15 11:24:08 +0530

**ठिकाणः– भोर .**　**( एस.डी.शिरसाट )**
**दिनांकः– १३.०१.२०२६.**　**२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**भोर.**

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order

| | |
|---|---|
| Name of the Steno | Shri. A.D.More |
| Court Name | Hon'ble S.D. Shirsat<br>2nd Jt.C.J.J.D.& J.M.F.C.,Bhor, Pune |
| Date of Order/Judgment | 13/01/2026 |
| Date of Sign Order/Judgment | 15/01/2026 |
| Order uploaded on | 15/01/2026 |